**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था(टीआरटीआय),पुणे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या अथवा करण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमामध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सर्वंकष धोरण ठरविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२३/प्र.क्र.६०(४)/बांधकामे**
पहिला मजला, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० ऑक्टोबर, २०२३

**वाचा:-**

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. बारटी २०२१/ प्र.क्र.११६/बांधकामे, दि. २८.१०.२०२१
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्र. बारटी-२०१९/प्र.क्र.२२३/बांधकामे, दि. २८.१०.२०२१
३) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. महाज्योती-२०२२/प्र.क्र.१५/ संस्था, दि. २९.०४.२०२२

शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग,शासन निर्णय क्र. महाज्योती- २०२२/प्र.क्र.१५/ संस्था, दि. १९.०५.२०२२

**प्रस्तावना:-**

राज्यात अनुसूचित जमातीच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाकरीता १९६२ मध्ये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यां संस्थेची स्थापना करण्यात आली. दि.२२.१२.१९७८ रोजीच्या शासन निर्णयान्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समतेचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व अनुसूचित जातीच्या कल्याणाकरिता संशोधन व प्रशिक्षण व्हावे या उद्देशाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ची स्थापना करण्यात आली आहे. तसेच राज्यातील मराठा, कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी -मराठा या लक्षित गटातील समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाकरिता छत्रपती शाहू महाराज संशोधन व

प्रशिक्षण संस्था (सारथी) पुणे या कंपनीची स्थापना दि.२५.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारकार्याचा वसा चालविण्यासाठी, त्यांच्या विचारातला सुशिक्षित समाज निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकासासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (महाज्योती) स्थापना शासन निर्णय दि.०८.०८.२०१९ अन्वये (कंपनी कायदा २०१३ अंतर्गत कलम ८ नुसार) केली आहे. तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम इत्यादी राबविण्यात येवून व इतर माध्यमातूनही विद्यार्थी,युवक-युवती इत्यादींचा विकास घडविण्यासाठी, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई (Academy of Maharashtra Research, upliftment and Training )(AMRUT) या नावाने दि.२२.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वायत्त संस्था स्थापन करण्यात आली आहे.

.३ या सर्व स्वायत्त संस्थामध्ये टीआरटीआय ही सर्वात जुनी संस्था असुन त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) ही संस्था आहे. इतर संस्था या मागील ४ ते ५ वर्षाच्या कालखंडामध्ये स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) या संस्थेच्या कार्यक्रमांच्या आधारावर अन्य संस्थाही त्यांचे कार्यक्रम तयार करीत असतात. मागील ५ वर्षाच्या कालखंडात या संस्था संशोधन तसेच त्यांच्याशी संबंधित सामाजिक घटकांसाठी अधिछात्रवृत्ती, विद्यार्थ्यांसाठी UPSC, MPSC, IBPS, पोलीस भरती, सैन्य भरती प्रशिक्षण याशिवाय रोजगार-स्वयंरोजगारासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करत आहेत. याशिवाय विभागाच्या योजना जनसामान्यांपर्यत पोहोचविण्याकरीता, त्यासाठी प्रचार प्रसिध्दी करण्याकरीता समतादूत, तारादूत अशाप्रकारचे प्रकल्पही राबविण्यात येतात. त्यामाध्यमातून त्या त्या समाज घटकांसाठी शासन / संस्था राबवित असलेल्या योजना तळागाळातील समाज घटकांपर्यंत पोहचविण्याचे काम करण्यात येत आहे.

अलीकडच्या काळात या सर्व संस्था त्यांच्या नियामक मंडळांच्या मान्यतेने अथवा शासन निर्देशानुसार अधिछात्रवृत्ती, विद्यार्थ्यांसाठी UPSC, MPSC, IBPS, पोलीस भरती, सैन्य भरती प्रशिक्षण राबवितात. हे निर्णय प्रत्येक संस्थेने अथवा विभागाने स्वतंत्रपणे घेतले असल्याने त्यामध्ये आवश्यक ती समानता राखली गेलेली नाही. त्यामुळे एका समाज घटकाच्या योजनेकडे निर्देश करुन दूसऱ्या समाज घटकासाठीही तशाच पध्दतीने योजना राबवावी, अशा मागण्या पुढे येऊ लागलेल्या आहेत. त्या अनुषंगाने फेलोशिप, परदेशी शिष्यवृत्ती, स्वयंम, स्वाधार इत्यादी योजनांच्या अनुषंगाने विविध मागण्या करण्याकरिता आंदोलने, उपोषणे इत्यादी मार्ग विद्यार्थ्यांमार्फत अवलंबले जात आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन पोलीस व प्रशासकीय यंत्रणेचा बराच वेळ हा या प्रकारची आंदोलने, उपोषणे इत्यादी हाताळण्यात खर्ची पडत आहे.

त्यानुषंगाने, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी); छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी) पुणे,महात्मा

ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर व महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई या संस्थामार्फत चालू असलेल्या योजना/कार्यक्रम यांचा फेरविचार करणे व कालानुरूप रोजगारभिमुख धोरण राबविण्यासाठी नवीन धोरण आखणे या सर्व बाबींचा साकल्याने विचार करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने बार्टी फेलोशिप २०२१ च्या संदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दि.१२.०४.२०२३ रोजी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा केली असता, मा.मुख्यमंत्री महोदयांनी सह्याद्री अतिथीगृह,मुंबई येथे बार्टी, सारथी, टीआरटीआय, महाज्योती व अमृत या स्वायत्त संस्थांच्या धोरणाबाबत एकसमान सर्वंकष धोरण तयार करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, दि. ३ मे, २०२३ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत देखील शासनाचे विविध विभाग/ उपक्रम/महामंडळे यांच्या मार्फत उच्च शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीचे निकष एकसारखे असावेत यासाठी शिफारस करण्याकरीता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले. त्या अनुषंगाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | अ.मु.स./प्र.स./सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ३ | अ.मु.स./प्र.स./सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग | सदस्य |
| ४ | अ.मु.स./प्र.स./सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ५ | अ.मु.स./प्र.स./सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य |
| ६ | अ.मु.स./प्र.स./सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |

सदर समितीच्या दि.४.५.२०२३ व दि.१.६.२०२३ रोजी बैठका पार पडलेल्या आहेत. सदर बैठकीतील चर्चेनुसार करण्यात आलेल्या शिफारशी मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात आल्या असता, मा.मुख्य सचिवांनी दिलेल्या निर्देशानुसार दि.१२.१०.२०२३ रोजी अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. उपरोक्त समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने दि.१९.१०.२०२३ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार या सर्व स्वायत्त संस्थांकरीता सर्वंकष एकसमान धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था(टीआरटीआय),पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, (मराठा, कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी -मराठा) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर(इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास

प्रवर्ग) व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई (खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक) व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या तसेच, भविष्यात प्रस्तावित करण्यात येणाऱ्या योजनांमध्ये अधिछात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमामध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता दि.१९.१०.२०२३ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार विविध विभागांत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, वसतिगृह व वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता,स्वाधार,स्वयंम अशा विविध प्रकारच्या योजनांमध्ये तसेच यापुढे प्रस्तावित करण्यात येणाऱ्या योजनांमध्ये एकसमानता रहावी यासाठी सर्वंकष धोरण निश्चित करण्याकामी अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे कायमस्वरूपी समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव, इ.मा.ब.क. विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विभाग | सदस्य |
| ७ | संबंधित विभागाचे सचिव | सदस्य |
| ८ | सचिव, सा.न्या. व वि.स. विभाग | सदस्य सचिव |

२. त्यानुषंगाने, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था(टीआरटीआय),पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वयित तथा प्रस्तावित विविध कार्यक्रमांचे सर्व प्रस्ताव संबंधित संस्थेने संबंधित विभागामार्फत तथा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे सर्व प्रस्ताव विभागाने अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर सादर करावेत.

३. प्रत्येक संस्थेने त्यांचा वार्षिक कृती आराखडा तयार करुन त्यास नियामक मंडळ/संचालक मंडळाची मान्यता घेऊन अ.मु.स.(वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घ्यावी.

४. परिशिष्ट “अ” मधील समितीच्या दि.४.५.२०२३, दि.१.६.२०२३ व दि.१२.१०.२०२३ रोजीच्या बैठकीतील शिफारशीनुसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी) पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती)

नागपूर, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व व इतर तत्सम शासनाच्या स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट “अ” मधील नमूद बाबींना या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१०३११४१७१४६५२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC344849650CE07C3F9ADC7E2CD4976B2852065E2ACD65F7CEE1828C10091458, cn=DINESH RAMCHANDRA DINGLE
Date: 2023.10.31 15:04:05 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
**सह सचिव ,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई, महाराष्ट्र राज्य,
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (गृह व विधी) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
५. मा. विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
६. मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
७. मा. राज्यमंत्री ( सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
८. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
९. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
१०. सर्व सन्माननीय सदस्य, विधान सभा/ विधान परिषद
११. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, महाराष्ट्र राज्य,
१२. मा. अमुस/प्रधान सचिव/सचिव (सर्व) मंत्रालयीन विभाग,
१३. मा. सचिव (सा.न्या. ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
१५. महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
१६. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था ,(टीआरटीआय)पुणे,
१७. संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था ,पुणे (सारथी)

१८. संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ,नागपूर (महाज्योती)
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ,(अमृत)मुंबई
२०. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
२१. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण,
२२. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषद
२३. निवडनस्ती (बांधकामे).